# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १०५-२२ दिनांक :- १६/०४/२०२२

## जनावरे चोरी करणा-या आरोपीतांना गजाआड करण्यात पेल्हार पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०६/०४/२०२२ रोजी ००.३० वा. ते ०५.४५ वा.चे दरम्यान वलईपाडा, काशि विश्वनाथ मंदिर जवळील रितिज आर्यवत गोशाळा, ता. वसई, जि. पालघर येथे फिर्यादी यांनी त्यांचा त्यांचे गोशाळेत बांधलेला बैल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करुन चोरुन नेले बाबत फिर्यादी नामे. श्री. देवीदत श्रीराम दिक्षीत, रा. बस डेपो जवळ, विरार (प.), ता. वसई, जि. पालघर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीता विरुध्द पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ३१०/२०२२ भा.दं.वि.सं. कलम-३७९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हयाचे अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळास भेट देवुन माहिती प्राप्त केली असता दोन अनोळखी इसम व एक पिकअप वाहन सदर ठिकाणाहुन गेल्याचे समजून आल्याने नमुद पिकअप वाहनाचा व आरोपीतांचा कसोशिने शोध घेतला असता आरोपी नामे १) मुजमील नुरमोहम्मद कुरेशी, रा. नालासोपारा (प.), ता. वसई, २) मुस्तफा इस्तखार उद्दीन, रा. नालासोपारा (पु.), ता.वसई, ३) अझहर सनावत शेख, रा. नालासोपारा (प.), ता. वसई यांना १२/४/२०२२ रोजी अटक करण्यात आली असून अटक आरोपीतांकडून त्यांनी गुन्हयात वापरलेले एकुण- २,००,०००/- रुपये किंमतीचे पिकअप वाहन हस्तगत करण्यात आले आहे. नमुद आरोपीत यांचेकडून वालीव पोलीस स्टेशन कडील गु.रजि.नं. I ३९२/२०२२, भा.दं.वि.सं. कलम-४२९, ३७९, ३४ सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा कायदा-२०१५ अधिनियम-१९७६ चे कलम-५,५(अ)(ब),६,९,११ सह महाराष्ट्र प्राणी रक्षण सुधारणा अधिनियम- १९९५ चे कलम-५(अ)(ब), सह प्राण्यांना क्रुरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्या बाबतचा अधिनियम-१९६० चे कलम- ११(ड)(आय) सह महाराष्ट्र प्राणी वाहतुक अधिनियम- १९७८ चे कलम-४७,४८,४९,५१,५४,५६ सह मोटार वाहन कायदा कलम- १३२/१७७ प्रमाणे दाखल गुन्हा देखील उकडकीस आला असून एकुण जनावर चोरीचे २ गुन्हे उघडकीस करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, जालिंदर मुनफन, पोना/प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.